स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षण, सातवा मजला, रायगड भवन, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
☎/🖷 : ०२२-२७५६१६२३, ई-मेल-mca_lfa@mahalfa.In,
संकेतस्थळ-www.mahalfa.maharashtra.gov.in

क्र.स्था१८/ब/मनपालेप/आस्था/वाहन निर्लेखन/ 775 दिनांक 2 9 SEP 2022

प्रति,
मा. सहाय्यक संचालक (संगणक),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

**विषय:**- शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ निर्लेखनानंतर विक्री करण्यासाठी दरपत्रके सादर करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१/०२/२०१६ मधील नियम पुस्तिका प्रकरण ४.२ अन्वये मागविण्यात येणाऱ्या दरपत्रकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेबाबत सुचना आहेत.

त्या अनुषंगाने, सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षण, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई या कार्यालयातील शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ हे बंद वाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई यांचे मान्यतेने निर्लेखित करण्यात आले आहे. सदर वाहन आहे त्या स्थितीत, आहे त्या जागेवरून विकण्याठी या नोटीसीद्वारे दरपत्रके सादर करण्याच्या घोषणापत्रास संचालनालयाच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्दी देण्यात यावी.

सहपत्र:- नोटीस व अटी व शर्ती.

मा.सहसंचालक (मनपालेप) यांच्या मान्यतेने.

(प्र.ग.सोटम)
लेखापरीक्षा अधिकारी (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षण, सातवा मजला, रायगड भवन, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
☎/🖷 : ०२२-२७५६१६२३, ई-मेल-mca_lfa@mahalfa.In,
संकेतस्थळ-www.mahalfa.maharashtra.gov.in

क्र.स्था.१८/ब/मनपालेप/आस्था/वाहन निर्लेखन/ 774 दिनांक 2 9 SEP 2022

## नोटीस

**विषय:-** शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ निर्लेखनानंतर विक्री करण्यासाठी दरपत्रके सादर करण्याबाबत.

**संदर्भ:-** १. सहसंचालक (प्रशासन), संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र.स्था.१८/ब/आस्था-७ नस्ती क्र.१५३अ/वाहन निर्लेखन/१६९५, दिनांक २३.०८.२०२२.
२. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई यांचे पत्र क्र.उप प्रपका/नमुं/नवीन नोंदणी/२०१८/ जा.क्र.२४९३, दिनांक ०५.०७.२०२१.
३. या कार्यालयाचे आदेश क्र.स्था.१८/ब/मनपालेप/आस्था/वाहन निर्लेखन/८९५, दिनांक ११.१०.२०२१.
४. या कार्यालयाचे नोटीस क्र.स्था.१८/ब/मनपालेप/आस्था/वाहन निर्लेखन/७४१, दिनांक १९.०९.२०२२.

सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षण, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई या कार्यालयातील शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ हे बंद वाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई यांचे मान्यतेने निर्लेखित करण्यात आले आहे. सदर वाहन आहे त्या स्थितीत, आहे त्या जागेवरून विकण्याठी संदर्भ क्रमांक ४ अन्वये नोटीस प्रसिध्द करून दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर नोटीसीद्वारे दरपत्रके दिनांक २७.०९.२०२२ पर्यत मागविण्यात आली होती. दरपत्रके मागविण्यात आलेल्या नोटीसीला अल्प प्रतिसाद मिळाल्याने नोटीसीची मुदतवाढ दिनांक ०६.१०.२०२२ पर्यत वाढविण्यात येत आहे.

तरी संबंधितांनी आपले दरपत्रक या सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून सोबत जोडलेल्या दरपत्रक प्रपत्रात भरून बंद लिफाफ्यात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, निर्मल भवन, तिसरा मजला,एम.आय.डी.सी..एरिया, घणसोली, नवी मुंबई, पिन कोड ४००७०१ येथे दिनांक ०६.१०.२०२२ सायंकाळी ०४.०० वाजेपर्यत स्वत: सादर करावीत किंवा सदर वेळेत कार्यालयात मिळतील या प्रकारे पोस्ट/कुरीअर सेवेद्वारे पाठवावे.

सदर दिनांकानंतर व्यक्तीश:/ टपालाने/रजिस्टर टपालाने/कुरीअर या प्रकारांद्वारे प्राप्त होणारी दरपत्रके दर प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाहीत. सदर दरपत्रके दिनांक ०७.१०.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील याची दरपत्रकदारांनी नोंद घ्यावी.

सोबत: अटी व शर्ती.

(बि.वि.देसाई)
सहसंचालक (मनपालेप).
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

प्रत:-
१. सहसंचालक (प्रशासन), स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
२. सहाय्यक संचालक (संगणक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
३. कार्यालयाचे नोटीस बोर्ड.

## अटी व शर्ती

१. शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ हे कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथील वाहनांच्या जागेत ठेवण्यात आले आहे.

२. शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ हे आहे त्या स्थितीत स्वखर्चाने वाहन उभ्या असलेल्या जागेतून न्यावयाचे आहे.

३. शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ चे फोटो नोटीसी सोबत जोडण्यात आले आहे.

४. शासकीय वाहन क्रमांक MH-४३ G ५६७ या निर्लेखित वाहनासाठीचे दरपत्रक मान्य झाल्यास त्याची रक्कम दिलेल्या मुदतीत शासन खाती जमा करावी लागेल.


MH.43.G.567

